4 AUG 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकस्मृती वसतिगृहास प्रा. डोंगरेंची ६.५० लाखांची देणगी

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी भौतिकशास्त्र अधिविभागाचे निवृत्त प्रा. डॉ. मुरलीधर डोंगरे यांनी ८० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून सहा लाख ५० हजार रुपयांच्या निधीचा धनादेश दिला. डॉ. मीना डोंगरे यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे तो सुपूर्द केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी डॉ. मुरलीधर डोंगरे यांच्या वतीने सहा लाख ५० हजार रुपयांच्या देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना डॉ. मीना डोंगरे. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, डॉ. सचिन पवार आदी.

विद्यापीठाने लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृह शंभर विद्यार्थिनींच्या निवास व्यवस्थेसाठीचा प्रकल्प प्रस्तावित केला आहे. ते लोकांच्या सहभागातून उभारावे आणि त्यातून लोकांच्या स्मृती जतन केल्या जाव्यात, या हेतूने विद्यापीठाने वसतिगृहाची संकल्पना मांडली. लोकांनी त्यांचे कुटुंब, आप्तस्वकीय यातील प्रिय व्यक्तीच्या नावे ठराविक निधी विद्यापीठाकडे द्यायचा आणि त्या व्यक्तीच्या नावे निवासी खोल्यांची उभारणी करायची, अशी ही संकल्पना आहे. वसतिगृहाचे महत्त्व लक्षात घेऊन दातृत्वाचा ओघ विद्यापीठाकडे सुरू आहे. डॉ. डोंगरे यांनी उदात्त भावनेतून ८० व्या वाढदिवसानिमित्त विद्यापीठास सहा लाख ५० हजार रुपयांचा निधी दिला आहे.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, डॉ. सचिन पवार, डॉ. प्रशांत चिकोडे, डॉ. विजय कोठावळे, डॉ. चिदानंद कनमाडी, डॉ. ऐश्वर्या पवार, डॉ. तुषार घाटगे उपस्थित होते.

4 AUG 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

निवृत्त प्राध्यापक मुरलीधर डोंगरे यांचा वाढदिनी उपक्रम : कुलगुरुंकडे धनादेश सुपूर्द

# विद्यापीठ वसतिगृहास साडेसहा लाखांची देणगी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी भौतिकशास्त्र अधिविभागाचे निवृत्त प्राध्यापक डॉ. मुरलीधर डोंगरे यांनी उदात्त भावनेतून त्यांच्या ८० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून ६ लाख ५० हजार रुपयांचा निधी दिला. डॉ. डोंगरे यांच्या वतीने त्यांच्या पत्नी व वनस्पतिशास्त्र अधिविभागाच्या निवृत्त प्राध्यापक डॉ. मीना डोंगरे यांनी शुक्रवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याकडे देणगीचा धनादेश दिला.



शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहासाठी डॉ. मीना डोंगरे यांनी शुक्रवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे देणगी सुपूर्द केली. यावेळी डॉ. प्रमोद पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. वैभव ढेरे, डॉ. सचिन पवार उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठ शंभर विद्यार्थिनींच्या निवास व्यवस्थेसाठी लोकसहभागातून लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृह प्रकल्प साकारत आहे. आपले कुटुंब, आप्तस्वकीय, प्रिय व्यक्तींच्या स्मृती जतन कराव्यात आणि त्यांच्या नावे ठरावीक निधी विद्यापीठाकडे द्यावा. त्यातून त्या व्यक्तीच्या नावे निवासी खोल्यांची उभारणी करण्याची विद्यापीठाची संकल्पना आहे. याचे महत्त्व लक्षात घेऊन दातृत्वाचा ओघ विद्यापीठाकडे सुरू आहे.

डॉ. मीना डोंगरे यांच्यासोबत शुक्रवारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे यांच्यासह डॉ. सचिन पवार, डॉ. प्रशांत चिकोडे, डॉ. विजय कोठावळे, डॉ. चिदानंद कनमाडी, डॉ. ऐश्वर्या पवार, डॉ. तुषार घाटगे, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 AUG 2024
पुढारी




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात क्रांतिसिंह नाना पाटील यांना अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी.

# शिवाजी विद्यापीठात क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजनानंतर अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, रणजित यादव, डॉ. शिवानंद यनकंची, डॉ. आशिष देशमुख, डॉ. नितीन कांबळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
[ 4 AUG 2024
लोकमत

# क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती

कोल्हापूर : क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती शनिवारी शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

4 AUG 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


डी. टी. शिर्के : वाणिज्य व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या पुस्तकाचे प्रकाशन

# शाश्वत विकासासाठी ज्ञान, व्यवसाय प्रणाली अभ्यासावी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार वाणिज्य व व्यवस्थापन अभ्यासक्रमातील बदलानुसार अभ्यासक्रमात भारतीय ज्ञान प्रणाली आणि भारतीय व्यवसाय प्रणाली वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यासावी, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात डॉ. ए. एम. गुरव व डॉ. आर. एस. साळुंखे लिखित भारतीय ज्ञान प्रणाली आणि भारतीय व्यवसाय प्रणाली या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. ते म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरण अभ्यासण्यासाठी वाणिज्य व व्यवस्थापनचा दोन क्रेडिटचा कोर्स असून, त्या अनुषंगाने हे पुस्तक विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञान प्रणालीच्या संकल्पना आणि उपयोजनांचा परिचय करून देते.



शिवाजी विद्यापीठात भारतीय ज्ञान प्रणाली आणि भारतीय व्यवसाय प्रणाली पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. आर एस. साळुंखे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. के. व्ही. मारूलकर उपस्थित होते.

वाणिज्य आणि व्यवस्थापन अधिविभागप्रमुख, प्रा. डॉ. ए. एम. गुरव आणि पलूस येथील कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. आर. एस. साळुंखे यांचे हे पुस्तक दोन भागांत आहे. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी देशाच्या विकासासाठी जीईआरचे महत्त्व, डॉ. के. कस्तुरीरंगन समितीच्या शिफारशी, डॉ. माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील टास्क फोर्स समितीद्वारे कौशल्य व मूल्याधिष्ठित शिक्षणासाठी नवीन शैक्षणिक धोरणामध्ये केलेल्या शिफारशी, भारतीय ज्ञान प्रणाली आणि भारतीय व्यवसाय प्रणालीबद्दल सांगितले. याप्रसंगी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, एम. बी. ए. विभागाच्या प्र. संचालिका डॉ. दीपा इंगवले, डॉ. के. व्ही. मारूलकर उपस्थित होते.

4 AUG 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात रंगले 'कविता प्रबोधनाची' निमंत्रितांचे संमेलन



कोल्हापूर : प्रतिनिधी

मराठी साहित्य क्षेत्रात खऱ्या अर्थाने भाकरीचा हुंदका समजलेला कवी म्हणजे अण्णा भाऊ साठे, असा सूर शिवाजी विद्यापीठात रंगलेल्या बहारदार निमंत्रितांच्या काव्यसंमेलनामध्ये कवितेच्या माध्यमातून बरसला. विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनातर्फे 'कविता प्रबोधनाची' या विषयावर शुक्रवारी निमंत्रितांचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले.

अण्णा भाऊ साठे यांच्या प्रबोधन परंपरेची साक्ष देणाऱ्या आणि समकालीन सामाजिक जीवनावर भाष्य करणाऱ्या कविता आजच्या संमेलनात सादर करण्यात आल्या. मंगसुळीचे कवी आबा पाटील यांनी संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषवले, तर चंद्रशेखर कांबळे (राधानगरी), रमजान मुल्ला (नागठाणे), विनोद कांबळे (तिसंगी), लता ऐवळे (अंकलखोप), प्रकाश नाईक (सरूड) व मंदार पाटील (कोल्हापूर) या कवींनी आपल्या कविता सादर केल्या.

कवी आबा पाटील यांनी मोनालिसाचं गूढ स्मित आणि श्रमिकांच्या हाताची सांगड घालणारी सुंदर कविता सादर केली. 'शेणाला गेलेल्या पोरी' लिहिणारे प्रख्यात कवी चंद्रशेखर कांबळे यांनी समकाळावर भाष्य करताना मानवतेचे महत्त्व अधोरेखित करणारी कविता सादर केली. कवी प्रकाश नाईक यांनी अण्णा भाऊ साठे यांचे संत परंपरेच्या विद्रोहाशी असणारे नाते उलगडून दाखवणारी कविता सादर केली.

कवयित्री लता ऐवळे यांनी माय-बापाच्या मायेचे हृदयस्पर्शी वर्णन करणारी कविता सादर केली. प्रास्ताविक प्रा. रणधीर शिंदे यांनी केले. सहभागी कवींचे स्वागत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन चंद्रशेखर कांबळे यांनी केले. यावेळी मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, विष्णू पावले, सुधीर कदम, शाहीर रणजित कांबळे, राजवैभव शोभा रामचंद्र, उमेश सुतार आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 AUG 2024
पुढारी

# स्वप्नील कुसाळेसह कुटुंबियांचे कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडून अभिनंदन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत नेमबाजीमध्ये ब्रॉंझपदक मिळवून कोल्हापूरचे नाव जागतिक नकाशावर झळकविण्याची ऐतिहासिक कामगिरी करणाऱ्या स्वप्नील कुसाळे याचे व त्याच्या कुटुंबियांचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी विशेष पत्र पाठवून शिवाजी विद्यापीठ परिवारातर्फे अभिनंदन केले.

स्वप्नीलने पॅरिस ब्रॉंझ पदक जिंकण्याची ऐतिहासिक कामगिरी नोंदविली. याबद्दल स्वप्नील यांच्यासह सर्व कुसाळे कुटुंबिय अभिनंदनास पात्र आहात, असे पत्रात म्हटले आहे.

4 AUG
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अवकाश प्रदर्शनाची सांगता

## उत्स्फूर्त प्रतिसाद; 'सकाळ'च्या वर्धापनदिनानिमित्त आयोजन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : 'अवकाश व चांद्रयान मोहीम-३ ची माहिती घेत विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक व नागरिकांच्या मनातील शंकांचे आज येथे निरसन झाले. तिसऱ्या दिवशीही 'अवकाश : चांद्रयान मोहीम-३' प्रदर्शनात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहातील नटश्रेष्ठ बाबूराव पेंढारकर कलादालनात दिवसभर गर्दीचा माहोल राहिला आणि सायंकाळी प्रदर्शनाचा समारोप झाला. 'सकाळ'च्या वर्धापनदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्रातर्फे प्रदर्शनाचे आयोजन केले होते.

दोन दिवस प्रदर्शनास विविध शाळांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक, संशोधक विद्यार्थ्यांनी भेट देऊन माहिती घेतली. आजही शहरासह ग्रामीण भागातील नागरिक सहकुटुंब प्रदर्शन पाहण्यास आले होते. संशोधन केंद्राच्या विद्यार्थ्यांनी चांद्रयान मोहीम कशी झाली, त्यातील यानाचे कार्य कसे असते, चंद्राच्या पृष्ठभागावरचे तापमान किती असते, तर पृष्ठभागाखाली दहा सेंटीमीटर अंतरावर तापमानात कसा आश्चर्यजनक बदल अनुभवायला मिळतो, याची माहिती विद्यार्थ्यांनी दिली. तसेच इस्रोच्या स्थापनेपासूनचे टप्पे स्पष्ट केले. सुमारे साडेपाच लाख रुपये किमतीच्या दुर्बिणीचे कार्य कसे असते, त्यात डाटा संकलन करून त्याचे निष्कर्ष कसे काढले जातात, याचे सखोल विवेचन केले. अवकाशातील ताऱ्यांची निर्मिती, धूमकेतू, ग्रहांची निर्मिती, धूलिकण, हायड्रोजन यांची माहिती देत त्यांनी विद्यार्थ्यांसह नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली. केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी संयोजन केले.



**कोल्हापूर :** 'सकाळ'च्या वर्धापनदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्रातर्फे आयोजित 'अवकाश : चांद्रयान मोहीम ३' प्रदर्शनात दुर्बिण पाहताना शालेय विद्यार्थी.

### नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये निरीक्षण

**■ विद्यापीठाचे अवकाश संशोधन केंद्र पन्हाळा येथे असून, तेथे नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये अवकाश निरीक्षणाचा उपक्रम असतो. ज्यांना निरीक्षणाचा अनुभव घ्यायचा आहे, त्यांनी विद्यापीठातील पदार्थविज्ञान अधिविभागात डॉ. राजीव व्हटकर यांच्याशी संपर्क साधावा.**

'Education is the passport to the future, for tomorrow belongs to those who prepare for it today.'
अनिश्चित, अतर्क्य भविष्यकाळाला सामोरे जाताना सर्वच देशांपुढे अनेक प्रश्न आहेत. समाजाला अप्रगत, प्रगत आणि अतिप्रगतसुद्धा प्रश्न, समस्या, आव्हाने असतातच. भविष्यकालीन आव्हानांना समर्थपणे तोंड देण्यासाठी त्या त्या समाजाने, देशाने आणि व्यक्तीनेही सर्वार्थाने सज्ज असायला हवे. व्यक्तीची अशी पूर्वतयारी, सज्जता करण्याची महत्त्वाची जबाबदारी शिक्षणाची आहे.

**- डॉ. बी. एम. हिर्डेकर**



# कोल्हापूरचा शिक्षणप्रवाह विस्ताराच्या दिशेने

भविष्यकाळाचा वेध घेताना शिक्षणाच्या सर्वच स्तरांवर अगदी पूर्व प्राथमिक शिक्षणापासून विद्यापीठीय उच्च शिक्षणापर्यंत शासन, व्यक्ती, संस्था अशा संबंधित घटकांनी शिक्षण गांभीर्याने घेतले आहे, असे दृश्य महाराष्ट्रात आणि कोल्हापूर जिल्ह्यात दिसत आहे. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाचा भक्कम पाया घातला. शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात कोल्हापूर जिल्हा शिक्षणाबाबत पुढे आहे.

महाराष्ट्राची शैक्षणिक राजधानी पुणे आहे (Not yet Oxford of the East) असे म्हटले तर कोल्हापूर शैक्षणिक उपराजधानी म्हणावी, असा शैक्षणिक विकास कोल्हापूर जिल्ह्यात सुरू आहे. 'शैक्षणिक हब' कोल्हापूर राज्याच्या शैक्षणिक नकाशावर स्पष्ट दिसते आहे. जिल्ह्यातील विकासाचा विचार करताना दोन स्तरांवर करणे आवश्यक आहे. एक म्हणजे गुणवत्तेचे भान आणि गुणवत्तावर्धन. विद्यापीठे, महाविद्यालये, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा आणि प्राथमिक शाळा गुणवत्तेचे भान ठेवून एकूण गुणवत्तेत आम्ही कुठे आहोत, असले पाहिजे, या भूमिकेतून कार्यरत आहेत.

**राष्ट्रीय स्तरावर NAAC चे A++ मानांकन :** ही शिवाजी विद्यापीठाची गुणवत्तेतील भरारी लक्षणीय आहे. विद्यापीठाचे सर्वच विभाग (अपवाद वगळून) उत्तम शिक्षण देऊन आपल्या विद्यार्थ्यांना उद्योग, शिक्षण, प्रशासकीय सेवा, माध्यमे, परदेशात संशोधन संधी, समाजसेवा अशा अनेक क्षेत्रांत रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

नव्या जगाच्या गरजा लक्षात घेऊन ऑनलाईन एमबीए, फिल्ममेकिंग, संगणकशास्त्र, कृत्रिम बुद्धिमत्ता, अभियांत्रिकीमधील प्रगत अभ्यासक्रम यांना प्राधान्य दिले जात आहे. स्पर्धेच्या वातावरणात काही पदवीस्तरावरील अभ्यासक्रमही सुरू केलेले आहेत. विद्यापीठाच्या विज्ञान विभागातील संशोधकांना जागतिक स्तरावरील उच्च दर्जाचे संशोधक म्हणून मानांकन मिळाले आहे. उच्च दर्जाचे संशोधन आणि पेटंट्स प्राप्त करणाऱ्या संशोधकांची संख्या नोंद घ्यावी, अशी आहे.



## कालसुसंगत / व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रोत्साहन

विद्यापीठाने गेली दोन दशके आणि अलीकडे शिकणाऱ्यांची संख्या, दूरवरच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देणे (Access) आणि रोजगार सहज मिळू शकेल असे शिक्षण देण्यासाठी सकारात्मक आणि उदार धोरण ठेवून महाविद्यालयांना पदव्युत्तर स्तरावरचे केमिस्ट्री, फिजिक्स, कॉम्प्युटर सायन्स, मायक्रोबायोलॉजी, बायोटेक्नॉलॉजी, स्टॅटिस्टिक्स असे विज्ञान शाखेतील अभ्यासक्रम आणि इंग्रजी, अर्थशास्त्र, इतिहास असे मानव्यशास्त्र शाखेतील अभ्यासक्रम दिले आहेत. विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना याचा खूप लाभ होत आहे. विद्यापीठापर्यंत पोहोचून, विद्यापीठात राहून शिकणे शक्य नसलेल्या पण शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे वरदान म्हणावे लागेल. उच्च शिक्षणाचा विस्तार आवश्यक होता. गुणवत्तावर्धनासाठी, नियंत्रणासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## व्यावसायिक अभ्यासक्रम

बी.बी.ए., बी.सी.ए., एम.सी.ए., एम.बी.ए., फार्मसी, नर्सिंग असे अभ्यासक्रम अनेक संलग्नित महाविद्यालयांतून सुरू आहेत. त्यांची संख्या वाढते आहे. हे अभ्यासक्रम बहुतांश विनाअनुदानित आहेत. विद्यापीठाने ठरवून दिलेल्या शिक्षणशुल्कानुसार ते विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत. आर्ट्स, कॉमर्स या विद्याशाखांच्या तुलनेत या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी लवकर आणि चांगल्या संख्येने मिळताहेत. या कोर्सेसमध्ये शिकणारी मुले आणि अन्य अभ्यासक्रम शिकणारी मुले यांच्यामुळे अशा महाविद्यालयातून बहुविद्याशाखीय वेगळे शैक्षणिक आदान प्रदान होते आहे, ज्याची सर्वंकष विद्यार्थी विकासासाठी गरज आहे. कॉम्प्युटर लॅब, अधिकच्या सोयी-सुविधा, स्मार्ट क्लासरूम असे अद्ययावत आणि डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर विद्यार्थ्यांना उपलब्ध होते आहे.

## महाविद्यालयांची गुणवत्तेच्या दिशेने वाटचाल

कोल्हापूर शहर आणि जिल्ह्याचा विचार करता, कोल्हापूर शहर शैक्षणिक हब झालेच आहे. या टप्प्यावर येण्यासाठी विवेकानंद कॉलेज, महावीर महाविद्यालय, कमला महाविद्यालय, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स या महाविद्यालयांचे मोठे योगदान आहे. शैक्षणिक गुणवत्ता आणि अन्य सर्व क्षेत्रांत चौफेर प्रगती करीत ही महाविद्यालये स्वायत्त झाली. विवेकानंद कॉलेज Empowered Autonomus झाले. कला, वाणिज्य, विज्ञान तसेच बी.बी.ए., बी.सी.ए. आणि पदव्युत्तर स्तरावरील एम.ए., एम.एस्सी., एम.कॉम., एम.बी.ए., एम.सी.ए. असे अभ्यासक्रम महाविद्यालयीन स्तरावर उत्तम पद्धतीने चालवून या महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना चांगल्या संधी उपलब्ध करून दिल्या.

या महाविद्यालयांना मिळालेल्या स्वायत्त दर्जामुळे, तसेच काही महाविद्यालयांना मिळालेल्या बी.व्होक. कोर्सेसमुळे विद्यार्थ्यांना वेगवेगळे नावीन्यपूर्ण आणि रोजगाराभिमुख कोर्स करण्याची संधी मिळाली. कला, क्रीडा, साहित्य, कौशल्यविकास या क्षेत्रातही या महाविद्यालयांचे यश उल्लेखनीय आहे.

शहरातील न्यू कॉलेज, शहाजी कॉलेज, शाहू कॉलेज या महाविद्यालयांतून शैक्षणिक गुणवत्तावर्धन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविले जाणारे उपक्रम अनुकरणीय आहेत. कॉमर्स व मॅनेजमेंट आणि प्रोफेशन कोर्सेससाठी उत्तम कामगिरी बजावणाऱ्या सायबर इन्स्टिट्यूटचे कार्य नोंद घेण्यासारखे आहे. 'एमबीए'साठी जिल्ह्यात अग्रक्रमाची पसंती या महाविद्यालयास असते. खास विद्यार्थिनींसाठी फॅशन, फूड, इंटीरियर डिझाईन या क्षेत्रातील पदवी शिक्षण येथे दिले जाते. बहुतांश विद्यार्थिनी या माध्यमातून त्या त्या क्षेत्रात उद्योजक झाल्या आहेत.

पान ५ वर ›

## विद्यापीठाचे सबलीकरण धोरण

शिवाजी विद्यापीठाने सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या सबलीकरणासाठी अनेक योजना कायमस्वरूपी आखल्या आहेत. शिक्षणाचा टक्का वाढवण्यासाठी आणि गुणवत्ता वाढण्यासाठी त्याचा खूप उपयोग झाला आहे.

- विद्यापीठाची महत्त्वाकांक्षी मेरिट स्कॉलरशिप संलग्नित महाविद्यालयातील अनेक मुला-मुलींना मिळते. दरवर्षी या शिष्यवृत्ती दिल्या जातात.
- उत्तम कार्य करणाऱ्या, विविध क्षेत्रांत लक्षणीय काम करणाऱ्या महाविद्यालयांना सन्मानपूर्वक गौरविण्यात येते.
- संलग्नित महाविद्यालयातील प्रगतिशील महाविद्यालयांना आर्थिक साहाय्य दिले जाते.
- संशोधन साहाय्य - महाविद्यालयातील संशोधकांना संशोधन साहाय्य देऊन महाविद्यालयीन स्तरावर संशोधन वाढीस चालना दिली जाते.
- उच्च शिक्षणासाठी गरजू, होतकरू, हुशार विद्यार्थी-विद्यार्थिनींना 'कमवा शिका' योजनेच्या साह्याने साह्य करून सबलीकरण केले जाते.
- या योजना महाविद्यालयांसाठी प्रोत्साहन देणाऱ्या आणि शिक्षणाचा लाभ गरजू विद्यार्थी, शिक्षक यांच्यापर्यंत पोहोचविणाऱ्या आहेत.

प्रवेश सुरू 2024-25
शिवाजी विद्यापीठ संलग्नीत
बॅचलर ऑफ डिझाईन - इंटिरिअर डिझाईन
- कालावधी : 04 वर्षे
- पात्रता : 12 वी पास (कोणतीही शाखा)
- प्रवेश क्षमता : 40
कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर - नवी दिल्ली मान्यता प्राप्त
DTE Code : 16124
MSBTE Code : 29099
डिप्लोमा इन इंटिरिअर डिझाईन ॲण्ड डेकोरेशन
- कालावधी : 03 वर्षे
- पात्रता : 10 वी पास • प्रवेश क्षमता : 40
कलाप्रबोधिनीज् इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन
कोल्हापूर
संपर्क : 9970375318/9011031326
KPID

# कोल्हापूरचा शिक्षणप्रवाह विस्ताराच्या दिशेने

>> पान ३ वरून

## `अभियांत्रिकी`ची यशस्वी वाटचाल

अभियांत्रिकी महाविद्यालयांत केआयटी कॉलेज, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, डी.के.टी.ई. टेक्स्टाईल इंजिनिअरिंग कॉलेज, टी.के.आय.टी. वारणा इंजिनिअरिंग कॉलेज ही महाविद्यालये स्वायत्त झालेली आहेत. या महाविद्यालयांनी प्रगत ब्रँचेस/अभ्यासक्रम सुरू करून, काही उद्योग सहयोगातून, भौतिक सुविधा अद्ययावत करून दर्जा वाढविला. शिवाजी विद्यापीठाचे डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी यामध्ये समाविष्ट आहे. इंजिनिअरिंग पदवीधरांना नोकरीच्या संधी देण्यासाठी सर्वच महाविद्यालये ट्रेनिंग, प्लेसमेंटसाठी विशेष लक्ष देत प्लेसमेंटचा टक्का वाढवीत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचा बाहेर जाण्याचा ओघ कमी होत आहे.

## वैद्यकीय शिक्षणाची वाटचाल

डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीने वैद्यकीय शिक्षणात आघाडी घेतली. MBBS, M.S., M.D., Nursing अशा अभ्यासक्रमांबरोबरच वैद्यकीय शिक्षणाला पूरक अशा बी.एस्सी., एम.एस्सी. अभ्यासक्रमांची उपलब्धता, निष्णात, तज्ज्ञ डॉक्टरांचे अध्यापन, सर्व सोयींनी सज्ज लॅब्ज, भौतिक सुविधा आणि उत्तम दर्जाचे संशोधन असे योगदान डी. वाय. पाटील मेडिकल (अभिमत) विद्यापीठाने कोल्हापूर आणि पश्चिम महाराष्ट्राला दिले आहे.

*तळसंदे कॅम्पसमध्ये कृषी, कृषी अभियांत्रिकी, इतर अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरू केले आहेत.

*राजर्षी छत्रपती शाहू महाराज मेडिकल कॉलेजने वैद्यकीय शिक्षण सामान्यांपर्यंत पोहोचविले आहे.

*कोडोलीत यशवंत मेडिकल कॉलेजच्या माध्यमातून आयुर्वेदिक BAMS, MD सुरू करून प. महाराष्ट्रात वैद्यकीय शिक्षण उपलब्ध केले आहे.

## शिक्षणाच्या सर्व क्षेत्रांत सर्वदूर विस्तार

शिक्षण क्षेत्रातील विकासात शिवाजी विद्यापीठासह विवेकानंद शिक्षण संस्था, रयत शिक्षण संस्था, डॉ. डी. वाय. पाटील शिक्षणसमूह, भारती विद्यापीठ, सायबर अशा मोठ्या संस्थांचे, समूहांचे साहाय्य मोलाचे आहे. लेखाच्या शब्दमर्यादेमुळे सर्वांचा नामोल्लेख करता येत नाही. अशा दूरवरच्या संस्था त्या त्या दुर्गम भागात नसत्या तर आता दिसणारे आणि अनेक क्षेत्रांत यशस्वी होणारे लोक निम्म्याहून कमी दिसले असते. मुलींचे शिक्षण तर झालेच नसते. मोठ्या संस्थांच्या बरोबरीने कुशलीने पण हिंमतीने या संस्था काम करीत आहेत. ते चिरंतन ऊर्जादायी आहे.

## हे व्हावेच....

■ प्रगतीच्या टप्प्यावर शासनाकडून काही गोष्टी सत्वर अपेक्षित आहेत. कोल्हापुरात आयआयटी, 'आयआयएम'सारखी नामवंत संस्था यावी. भारताला लढवय्या, पराक्रमी लष्करप्रमुख दिलेल्या आणि आजही शेकडो लष्करी अधिकारी आणि सैनिक देणाऱ्या जिल्ह्याला मिलिटरी ॲकॅडमी, सैनिकी शाळा मिळावी. हरितक्रांती, धवलक्रांती, शिक्षणक्रांती यशस्वी करणाऱ्या जिल्ह्याला एखादी राष्ट्रीय स्तरावरील संशोधन संस्था मिळावी. आज ज्या यशाच्या टप्प्यावर जिल्हा पोहोचला आहे त्यामध्ये अशा गोष्टींचे योगदान बहुमोल ठरेल.

## 'सकाळ'ची पथदर्शी कामगिरी

■ 'सकाळ ग्रुप' आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षण परिषदा आयोजित करतो, ही मोलाची गोष्ट आहे. 'यिन' (YIN)च्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी शिस्तबद्ध पद्धतीने चालविलेले उपक्रम, विद्यार्थ्यांच्या अंगी समाजभान रुजवणारा मोठा संस्कार आहे. जाणकार, जबाबदार युवा नेतृत्वाची जडणघडण या माध्यमातून होत आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून प्रबोधन हा वसा आहेच; सोबत अनौपचारिक दिले जाणारे शिक्षण ही 'सकाळ'ची उल्लेखनीय पथदर्शी कामगिरी आहे. वर्धापन दिनाच्या खूप खूप शुभेच्छा!

## कॉर्पोरेट/संस्था/विद्यापीठे/ शाळा यांचा सहभाग

संजय घोडावत विद्यापीठ, संजय घोडावत विद्यापीठाच्या इंग्रजी माध्यमाच्या CBSC/ I B School, इंजिनिअरिंग कॉलेज यांचा शैक्षणिक दर्जा आणि भौतिक सुविधा उत्तम आहेत. कोल्हापुरात मिशनरीज संस्थांच्या दोन शाळा सेंट झेविअर्स आणि होलीक्रॉस इंग्रजी माध्यमातून उत्कृष्ट शिक्षण देत आलेल्या आहेत. शाहू विद्यालय, न्यू मॉडेल स्कूल, कोल्हापूर पब्लिक स्कूल, शांतिनिकेतन, विबग्योर स्कूल, पोदार स्कूल या आणि अशा शाळा इंग्रजी माध्यमाचे चांगले शिक्षण देत आहेत.

## माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा

कोल्हापूर आणि दूरवरच्या काही तालुक्यांत नवोदय विद्यालय प्रवेशासाठी, सैनिक विद्यालय प्रवेशासाठी, शासकीय शिष्यवृत्तीसाठी, सी.बी.एस.ई. शिष्यवृत्ती, एन.एस.पी. शिष्यवृत्ती अशा परीक्षा, शिष्यवृत्तीसाठी शिक्षक कष्ट घेत आहेत. अशा शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना मिळवून देण्यासाठी शाळाशाळांमधून चांगली स्पर्धा सुरू आहे.

## प्राथमिक शाळांचे महत्त्वाचे कार्य

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा, पालिका, महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळा वेगळे भान घेऊन कार्यरत आहेत. नव्या युगाची आव्हाने लक्षात घेऊन तंत्रज्ञानाधिष्ठित, ऑनलाईन शिक्षण डिजिटल साधनांमार्फत प्राथमिक स्तरावर जोमाने सुरू आहे. विशेषतः बारावी उत्तीर्ण होऊन डी.एड. झालेले तसेच पूर्वी डी.एड. झालेले प्राथमिक शिक्षक तंत्रस्नेही शिक्षक झाले आहेत. त्यांचे स्वतःचे शिक्षण सुरू ठेवून विद्यार्थ्यांना अतिप्रगत जगाच्या गरजांनुसार आवश्यक डिजिटल लिटरसी आणि डिजिटल प्रोफिशियन्सी प्राप्त करून देत आहेत. जिल्ह्यात क्रिएटिव्ह टीचर्स फोरम, समाजभान ग्रुप असे शिक्षकांचे समूह या गुणवत्तावर्धन मोहिमेत कार्यरत आहेत.

(लेखक शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक आहेत.)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 AUG 2024

पुण्यनगरी

# 'जे.जे.अभियांत्रिकी'च्या विद्यार्थ्यांचा गुणवत्तेत डंका

जयसिंगपूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या २०२३-२४ मधील इंजिनिअरिंग अभ्यासक्रमाच्या डॉ.जे.जे. मगदूम अभियांत्रिकीच्या १६ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले.

सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातून प्रथमेश कांबळे याने चौथी रँक मिळवली, जुवेरिया मुजावर ही पाचव्या रँकमध्ये उत्तीर्ण झाली आहे. झुरेन गुपिया लॅटिन लुंग यांनी सहावी रँक मिळवली आहे. कॉम्प्युटर विभागाची निकिता माने हिने दुसरी रँक मिळवली. ई.टी.सी. विभागाच्या हर्षदा मगदूम हिने पाचवी रँक मिळवली. आय.टी. विभागातून अवंतिका जांभळे अव्वल रँक मिळवून यशस्वी झाली, तर वैष्णवी लाड, सायली पाटील, संग्रामसिंह भुसणार, साक्षी पाटील, प्रतीक्षा सातपे, सोनल मेथे, वैभवी गायकवाड, प्रीती कदम, शीतल साळुंखे व यशोदा कोलपे यांनी अनुक्रमे २ ते १० रँक मिळवून मेरिट लिस्टमध्ये अव्वल स्थान मिळवले. ट्रस्टचे चेअरमन डॉ. विजय मगदूम यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी कॅम्पस डायरेक्टर डॉ. सुनील आडमुठे, प्राचार्य डॉ. गोपाळ मुळगुंद, डीन-अ‍ॅकॅडमिक प्रा. ए. एस. साजणे, डीन स्टुडंटस् प्रा. पी. पी. पाटील व विभागप्रमुख उपस्थित होते.